# कविवर्य बा. भ. बोरकर
# जन्मशतसांवत्सरिक

सम्पादक

सु. म. तडकोडकर

प्रतिमा प्रकाशन

Baa. Bha. Borkar Janma-shata-saanvatsarik
(Birth Centenary Volume of the literary works of Marathi Poet
Balkrishna Bhagawant Alias Baakibaab Borkar (Edited)
Editor : Professor (Dr.) S. M. Tadkodkar

बा.भ.बोरकर जन्मशतसांवत्सरिक (सम्पादन)
संपादक : प्रोफेसर (डॉ.) सु. म. तडकोडकर

प्रकाशन क्र. ३९१

© या संबंधित संपादनाचे सर्व अधिकार प्रकाशकाजवळ,
परंतु या ग्रंथातील प्रस्तावनेचे व प्रत्येक निबंधाचे अधिकार संबंधित लेखकाजवळ

प्रकाशक :
अरुण पारगावकर
प्रतिमा प्रकाशन
१३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेण्ट
नवा विष्णुमंदिर चौक, पुणे - ४११०३०
दूरध्वनी : ०२०-२४४७८९०८, भ्रमणध्वनी ९८५०९५०७०४

मुद्रक : इंदिरा प्रिन्टिंग प्रेस, पुणे

मुखपृष्ठ : रमेश भारताल

मुद्रितशोधन : मिलिंद बोरकर, पुणे; भ्रमणध्वनी : ९९२२९१४९६६

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी, २०१२

मूल्य : रु. ४००/-

# १७

# बा. भ. बोरकर यांच्या कादंबऱ्यांतील सामाजिकता

डॉ. वासुदेव दत्तात्रय सावन्त

मराठी आणि कोंकणी साहित्यक्षेत्रांत कवी म्हणूनच बाळकृष्ण भगवन्त बोरकरांची नाममुद्रा चिरंतन झालेली आहे; पण त्या तुलनेत त्यांनी कथा, कादंबरी, ललित निबंध अशा अन्य साहित्यप्रकारांच्या स्वरूपात केलेले गद्य लेखन बरेचसे दुर्लक्षितच राहिलेले आहे. 'भावीण'सारखी एखादी कादंबरी वगळता मराठी समीक्षकांनी आणि वाङ्मयेतिहासकारांनी बोरकरांच्या अन्य कादंबऱ्यांची पुरेशी दखल घेतली नाही. बोरकरांच्या गौरवार्थ प्रसिद्ध झालेले मराठी व कोंकणी विशेषांक ('माण्डवी', 'बाकी' विशेष वगैरे) प्रामुख्याने त्यांच्या काव्याची आणि व्यक्तित्वाविषयीचीच चर्चा करतात. गद्य लेखनापेक्षा त्यांच्या काव्याची आणि त्यांच्या सौंदर्यवादी व्यक्तित्वाची अधिक दखल घेतली जाणे, हे स्वाभाविकच म्हणता येईल; कारण त्यांनी त्यांची प्रतिभा आणि' निर्भररम्य संवेदनशीलवृत्ती कवितेतून पणाला लावली. मात्र तसे गद्य लेखनात घडलेले आहे, असे म्हणवत नाही. त्यांच्या निर्भरशील सौंदर्यवादी वृत्तीचा प्रत्यय त्यांच्या गद्य रचनेतून येत असला, तरी त्यांच्या कवितेप्रमाणे त्यांचे गद्यलेखन वाचक-समीक्षकांना विशेषत्वाने भिडले आहे, असे दिसत नाही. मराठीतील कवी व संशोधक-समीक्षक प्रोफेसर सु. म. तडकोडकर यांनी संपादित केलेल्या 'बा. भ. बोरकर जन्म-शत-सांवत्सरिका'च्या निमित्ताने या निबंधात त्यांच्या गद्य साहित्याची आवर्जून दखल घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत निबंधात बोरकरांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अंगाने विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

### कादंबरीलेखन व सामाजिक संदर्भ :

खरे तर, कादंबरीसारख्या साहित्यप्रकाराचा कोणत्याही समीक्षा दृष्टीने अभ्यास केला, तरी तो अपरिहार्यपणे सामाजिक संदर्भांकडे वळतोच. साहित्य ही कलाच जीवनदर्शनात्मक असते आणि अन्य कोणत्याही साहित्यप्रकारांपेक्षा कादंबरीद्वारे जीवनाचा व्यापक व विशाल पट उभा करता येतो. केवळ काही व्यक्ती आणि त्यांच्या जीवनातले प्रसंग यांच्या पलीकडे जाऊ शकणारी कादंबरी एक मानवी समूहाचा, एखाद्या परिसर-प्रदेशातील जीवनाचा अन् पोटसंस्कृतीचा छेद घेऊ शकते. त्यामुळे अन्य साहित्यप्रकारांच्या तुलनेत कादंबरी अधिक सामाजिक स्वरूपाची असते. म्हणूनच कादंबरीचा वाङ्मयीन विचार अपरिहार्यपणे सामाजिक अंगाने होतो.

केवळ सामाजिक कादंबरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्याच नव्हे, तर अन्य कोणत्याही कादंबरीचा सामाजिक अंगाने विचार करता येतो. कादंबरीची सामाजिकता अगदी सकृद्दर्शनीच तिच्या आशयद्रव्याच्या अंगाने तपासता येते. कादंबरीतील व्यक्ती-प्रसंग कोणत्या समाजस्तराच्या वर्गातील (मध्यम, उपेक्षित, नागरी, ग्रामीण, दलित इत्यादी) आहेत, कोणत्या अधिवासातील वा प्रदेशातील आहेत, त्यांच्या चालीरीती-विचारमूल्ये कोणती आहेत, हे पाहिले जाते. आशयद्रव्याप्रमाणेच लेखकाच्या अंगानेही कादंबरीची सामाजिकता तपासता येते. लेखक कोणत्या समाजस्तरात वाढलेला आहे, संस्कारी झालेला आहे, कादंबरीद्वारे तो काय सांगू इच्छितो, त्यासाठी त्याने कादंबरीलेखनासाठी कोणते आशयद्रव्य निवडलेले आहे व कोणत्या जीवनदृष्टिकोनातून मांडलेले आहे, हे न्याहाळणे अपरिहार्य वाङ्मयीन कर्तव्य ठरते. त्याचा जीवनदर्शनामागचा मूल्यविवेक कोणता, हे पाहता येते. तो ज्या वाङ्मयीन व सांस्कृतिक परंपरेत लिहितो, त्याचा प्रभाव त्याच्या साहित्यकृतीवर कसा पडलेला आहे, हे दाखवता येते. लेखकाची निर्मिती आणि साहित्यनिर्मितीची वाचनप्रक्रिया याकडे एक सामाजिक व्यवहार म्हणून पाहता येते. पण या निबंधात आशयद्रव्य आणि ते मांडण्यामागील लेखकाची जीवनदृष्टी या अंगाने बोरकरांच्या कादंबरीचा विचार केला आहे.

### बोरकरांचे कादंबरीलेखन :

कविवर्य बोरकरांनी १९३८-१९५० या काळात 'मावळता चंद्र',

'अंधारातील वाट' आणि 'भावीण' या तीन सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. तब्बल तेहेतीस वर्षांनंतर म्हणजे १९८३ मध्ये त्यांची चौथी कादंबरी 'प्रियकामा' प्रकाशित झाली.

पहिल्या तीन कादंबऱ्या सामाजिक, तर 'प्रियकामा' ही पौराणिक आहे. बोरकरांनी स्टीफन झ्वाइगच्या 'द बर्निंग सिक्रेट' या कादंबरीचे 'जळते रहस्य' या शीर्षकाने भाषांतर केले आहे. पण प्रस्तुत निबंधात या भाषांतरित कादंबरीचा विचार केलेला नाही.

एके काळी नारायण सीताराम फडके व विष्णू सखाराम खांडेकर यांच्या मराठी कादंबऱ्यांनी वाचकांना वेड लावले होते, ही वस्तुस्थिती डोळ्यांआड करता येणार नाही. किंबहुना, त्याच कारणाकरिता त्या काळाला मराठी कादंबरीच्या क्षेत्रात 'फडके-खांडेकर युग' म्हणून ओळखले जाते. बोरकरांनी 'प्रियकामा' वगळता अन्य कादंबऱ्या त्या काळात लिहिल्या होत्या. विदग्ध साहित्यिक हरी नारायण आपटे यांनी १९२०पूर्वीच्या काळात रूढ केलेल्या सामाजिक वास्तववादी कादंबरीच्या संकल्पनेत परिवर्तन झाले होते. या काळातल्या कादंबरीत सामाजिक-राजकीय आशयसूत्रे येत असली, तरी कादंबरीची रचना प्रामुख्याने कल्पनारम्य व रंजनात्मक वळणाने जाणारी अशीच असे. या काळात लिहिलेल्या बोरकरांच्या कादंबरीवर समकालीन कादंबरी-परंपरेचा परिणाम दाखवता येत असला; तरी त्यांच्या 'भावीण', 'मावळता चंद्र' यांसारख्या कादंबऱ्या तत्कालीन फडके यांच्या कादंबरीप्रमाणे वास्तवविन्मुख आणि केवळ रंजनवादी नाहीत, हे आवर्जून नमूद करावे लागते.

### बोरकरांच्या कादंबऱ्या प्रादेशिक नव्हेत :

बोरकरांच्या तीन सामाजिक कादंबऱ्यांपैकी 'भावीण' आणि 'मावळता चंद्र' या कादंबऱ्या बोरकरांना समकालीन असलेल्या गोमंतकीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत. 'अंधारातील वाट'मध्येही गोमंतकीय जीवनाचे चित्रण असले; तरी ज्या अर्थाने 'भावीण' किंवा 'मावळता चंद्र' यांना प्रादेशिक कादंबरी ही संज्ञा लावता येते, तसे 'अंधारातील वाट' या कादंबरीबाबत म्हणता येणार नाही. खरे तर, विशिष्ट प्रदेशाचे चित्रण करायच्या हेतूने या कादंबऱ्या लिहिल्या आहेत, असे म्हणवत नाही. बोरकरांच्या 'भावीण' कादंबरीला

मराठी समीक्षकांनी 'प्रादेशिक कादंबरी' अशी संज्ञा उपयोजली असली तरी आपल्या कादंबऱ्यांचा कस केवळ प्रादेशिकतेच्या निकषावर ठरवू नये, असे बोरकरांनी 'मावळता चंद्र' या कादंबरीला लिहिलेल्या प्रस्तावनेत म्हटले आहे. त्यांचे ते मत मान्य होण्यासारखेच आहे.

**भावीण :**

'भावीण' व 'मावळता चंद्र' या कादंबऱ्या गोमंतकातील मध्यमवर्गीय व उच्चवर्णीय समाजस्तरातील जीवनानुभवाचे चित्रण करणाऱ्या आहेत. 'अंधारातील वाट' या कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा मध्यमवर्गीय असली तरी ड्रायव्हर, वेश्या तसेच विवाहबाह्य नात्यातून जन्मलेल्या व्यक्ती अशा सर्वच स्तरांतील व्यक्तिरेखा या कादंबरीत साकार झाल्या आहेत.

'भावीण' या शीर्षकावरून ही कादंबरी गोमंतकात पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या भावीण नामक समाजाचे चित्रण करणारी आहे हे स्पष्टच होय. लेखकाने 'भावीण' या कादंबरीत गोमंतकातील प्रगतिशील व पुरोगामी विचारानुसरण करण्याची गौरवशाली परंपरा असलेल्या गौड सारस्वत ब्राह्मण समाजातील मानसिकतेत दडलेले वास्तव प्रत्ययकारकरीत्या शब्दचित्रित केले आहे. रवळूबाब कामत आणि त्यांच्या विरोधात ऋषी व केशव या प्रमुख व्यक्तिरेखांद्वारे गौड सारस्वत ब्राह्मण समाजाच्या दोन पिढ्या व त्यांच्यातील वैचारिक दरी यांचे शब्दचित्रण त्यांनी केले आहे. कथानकातील हाच संघर्ष महत्त्वाचा ठरतो. रवळूबाब कामतांच्या पारंपरिक श्रद्धेच्या व कल्पनेच्या विरुद्ध वागणाऱ्या या दोन युवकांच्या माध्यमाद्वारे समाजपरिवर्तनाचा विचार त्यांनी कादंबरीत मांडला आहे. बोरकरांना जवळची वाटणारी गांधीवादी विचारधारा केशवच्या माध्यमाद्वारे कादंबरीत येते. केशवने देवीच्या पालखीची मिरवणूक हरिजन वस्तीतून नेणे, त्या वस्तीत विद्यालय चालविणे, अशा केलेल्या कृत्यांमुळे त्याच्यावर त्या समाजाचे अध्वर्यू स्वामींकरवी बहिष्कृत होण्याची (*रायसला बळी पडण्याची*) वेळ येते. रूढीग्रस्त पारंपरिक धर्माऐवजी माणुसकीचा धर्म पाळणारा ऋषी त्याच्या वडिलांच्या मनाविरुद्ध एका भाविणीशी विवाह करण्याचा विचार करतो.

"आम्हा ब्राह्मणांइतका दांभिक समाज दुसरा नाही. सत्याचं आणि

धर्माचं नाटक करीत सगळ्या जातींना पिळण्याचं काम पिढ्यान्‌पिढ्या आम्ही करीत आहोत. म्हणून प्रत्येक जात आम्हाला सापासारखी लेखित असते.'' (तृतीयावृत्ती, पृ. १५७)

या उद्‌गारातून ब्राह्मण समाजाच्या शोषक वृत्तीवर ह्रषी बोट ठेवतो. त्याद्वारे पुरोगामी विचारांचे लेखक बोरकरांची स्व-समाजाकडे पाहण्याची जी आत्मपरीक्षणात्मक दृष्टी (ती बव्हंशी त्या समाजात आढळते) व्यक्त होते, ती महत्त्वाची होय. पण स्व-समाजाकडे पाहण्याची ही वृत्ती पुरेशी रोखठोक वा तटस्थ नाही, हे या कादंबरीच्या मुख्य आशयसूत्राची मांडणी पाहिल्यास ध्यानात येते. अर्थात ज्या काळात ही कादंबरी लिहिली गेली, त्या काळात एक वेळ मुक्त स्वरूपाची प्रीतिभावना व्यक्त करणे सुलभ-सोपे होते; परंतु स्वतःच्या असो किंवा अन्य समाजातील असो, एखाद्या रूढीला समाज-परिवर्तनाच्या मिषाने एका विशिष्ट मर्यादेपलीकडे खेचून नेणे दुरापास्तच होते, ही वस्तुस्थिती दृष्टिआड करता येणार नाही. वर्तमानकाल असा आहे की, गोमंतकातील भावीण नामक ही संस्थाच लयाला गेलेली असल्याने तिच्या खुणा आता राहिलेल्या नाहीत.

कादंबरीची नायिका शेवंती ही एक भावीण आहे. भाविणीची दुःखे आणि व्यथा प्रामुख्याने व्यक्तिगत पातळीवरच व्यक्त होतात; पण एक शोषित समाज म्हणून त्या भावीण समाजाचे सामाजिक दृष्टीतून विश्लेषण या कादंबरीच्या मांडणीद्वारे होत नाही. शेवंती ही इतर भाविणींपेक्षा वेगळी आणि स्त्री म्हणून सामान्यांहून आदर्श म्हणून रेखाटलेली आहे. कादंबरीकाराकरवी तिने *भावीण* असण्यांचा, भावीणधर्माचा अनायास गौरवच झाला आहे. कामतृप्तीच्या अभावी ह्रषीला मनोविकृतीचा आजार होतो. त्याला स्त्री-सुख मिळणे, हा त्या आजारावरचा उपाय. रंजना नामक उच्चवर्णीय सुसंस्कृत युवतीशी त्याचे लग्न ठरलेले आहे. रंजनाची लग्न झाल्याने ह्रषीच्या आजारावर हा उपाय आपोआपच होणार, असे कुणाही वाचकाला वाटू शकेलही. पण तसे न करता लेखकाने शेवंतीच्या सहवासानेच हा आजार बरा होतो, असे दाखविले आहे. येथे शेवंती आपली इतर भाविणींहून वेगळी आदर्शवादी भूमिका कडेला ठेवून पत्नीधर्मापेक्षाही भावीणधर्म थोर आहे, म्हणून ह्रषीच्या सहवासात राहून त्याला कामक्षुधेने झालेल्या विकारातून बरी करते. (या उपायाच्या निमित्ताने १९७०च्या काळात आलेला 'खिलौना' हा हिंदी चित्रपट आठवतो. त्यातही वेड्या संजीवकुमारला

मुमताज बरी करते.) वास्तविक, हृषीला हा काम-अतृप्तीचा विकार रंजनेकरवी झालेल्या मानभंगातून झालेला आहे; पण लेखकाने एका सात्त्विक भाविणीला प्रतिष्ठित घराण्यातील रंजनेने केलेला प्रमाद दूर करायला भाग पाडले आहे. यावरून एका शोषित समाजस्तराकडे पाहण्याची लेखकाची दृष्टी परिवर्तनवादी नसून यथास्थितीवादीच आहे, असे मत होऊ शकते.

**समाजव्यवस्था मोडणे हे प्रादेशिकतेचे लक्षण नव्हे :**

स्व-समाजाच्या विरोधाला न जुमानता शेवंतीशी लग्न करण्याचा निश्चय करून हृषी समाजव्यवस्था मोडू पाहतो; पण तसे होऊ न देता, लेखकाने कादंबरीचा शेवट शेवंतीच्या आत्महत्येने केला आहे. हे वाचले की, लेखकाची समाजपरिवर्तनाची दृष्टी केवळ हरिजनवर्गापुरतीचा मर्यादित असून स्व-समाजाविषयी मात्र त्याची भूमिका यथास्थितीवादी आहे, असे जाणवू शकते. तथापि, समाजव्यवस्था मोडण्याची वृत्ती ही प्रादेशिक होऊ शकत नाही.

**मावळता चंद्र :**

बोरकरांची 'मावळता चंद्र' ही कादंबरी विशेष निर्भरशील सौंदर्यवादी जाणीव व्यक्त करणारी आहे. मनाच्या विद्युतशक्तीने चराचरात सौंदर्यदीप लागलेले पाहणारा या कादंबरीचा नायक शशांक सरदेसाई हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचाच आविष्कार वाटतो.

'आपल्या कलाकृतीत आपल्या वैयक्तिक जीवनाच्या सीमारेषा कुठं संपतात आणि चिरंतन मानवतेचं जीवन कुठं सुरू होतं, हे कळत नाही', असे या कादंबरीत लेखकाने म्हटले आहे. त्याचा प्रत्यय या कादंबरीद्वारेच फार प्रभावीपणे येऊ शकतो. कादंबरीचा नायक चित्रकार शशांक हा एकूण जगण्याकडेच सौंदर्यासक्त वृत्तीने पाहणारा असल्याने त्याला सामान्यासारखे चाकोरीबद्ध जगण्यात समाधान नाही. पण त्याची पत्नी रजनी पतीवर निस्सीम प्रेम करणारी एक सामान्य गृहिणी आहे. ती त्याच्या सौंदर्यवृत्तीला साथ देणारी नाही. तिच्या दृष्टीत आईचे वात्सल्य आहे, वागण्यात व हसण्यात बहिणीचा पाठराखेपणा आहे; पण अप्सरेची मादक व चंचल धुंदी नाही, हे त्याला सतत जाणवत असे. स्वतःच्या नवऱ्याला कलेत विशेष गोडी असल्याचे तिला कळत तर नाहीच; पण गोड गाणे, रम्य

चित्र, रसरशीत निसर्गदृश्य अथवा उत्कट प्रसंग पाहून शशांकच्या डोळ्यांत पाणी तरारते, पण रजनीच्या मनाची तार कधी झंकारत नाही. आपली रजनी कधी रवींद्रनाथ टागोरांच्या उर्वशीसारखी होऊ शकत नाही, याचे त्याला असमाधान वाटत राहते.

त्याच्या मनातली ही उर्वशी त्याला दियान या ख्रिस्ती मैत्रिणीच्या रूपात भेटते. अभिरूचिसंपन्न वडिलांच्या संस्कारात वाढलेली, नृत्य-संगीत-चित्रादी कलांविषयीची मार्मिक जाण असणारी, बाल्झाक, बिथोवन्, मोझार्ट, व्हिन्सी, म्युसे या कलावंतांची चरित्रे वाचून कलावंत मनाला सुलभपणे उमजून घेणारी; सामाजिक, धार्मिक अशा पारंपरिक बंधनांपासून मनाने मुक्त असलेली दियान या शशांकच्या कलावंत मनाला खरीखुरी साथ देणारी मैत्रीण म्हणून त्याच्या जीवनात येते. तिला हिंदू वेषात एक मॉडेल म्हणून समोर ठेवून शशांकने काढलेल्या कुमारी मातेच्या चित्राला आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात पारितोषिक संपादून देते. कादंबरीत रंगविलेली दियान म्हणजे लेखक बोरकरांनी त्यांच्या निर्भरशील व सौंदर्यासक्त चित्तात जपलेली स्त्रीप्रतिमाच आहे, असे वाटते. गोमंतकातील कैक कलावंतांनी असे पुरस्कार संपादलेले आहेत. त्या वस्तुस्थितीचे प्रतिबिंब या कादंबरीत उमटते.

'फडके-खांडेकर युगा'तल्या कादंबरीप्रमाणे बोरकरांची 'मावळता चंद्र' ही अंतिमत: एक प्रेमकथाच ठरत असली, तरी समकालीन कादंबरीपेक्षा या प्रणयकथेचे वेगळेपण उठून दिसते. रजनी-शशांक-दियान या प्रेम-त्रिकोणात शशांकच्या कलावंतमनाची जी उलघाल बोरकरांनी दाखविली आहे; त्यातच या कादंबरीचे यश सामावले आहे, असे म्हणता येते. चित्रकारच नायक असणाऱ्या फडके यांच्या 'जादूगार' या कादंबरीपेक्षा बोरकर यांची 'मावळता चंद्र'मध्ये व्यक्त झालेली कलाविषयक जाण अधिक प्रगल्भ आहे. यातील प्रेम-त्रिकोणाची होणारी परिणतीही ठरावीक रंजनप्रधान वळणाने जाणारी नाही. सामाजिक दृष्ट्या विचार केला, तर कादंबरीतला हा प्रेम-त्रिकोण गोमंतकीय समाज-संस्कृतीचे विशेष दर्शन घडविणारा आहे. एकीकडे गोमंतकीय हिंदू - विशेषत: गौड सारस्वत ब्राह्मण-समाजाचे, त्यांच्या विचार-कल्पना-वर्तनाचे दर्शन रजनी आणि शशांक या व्यक्तिरेखांच्या माध्यमाद्वारे होते; तर गोमंतकातील उच्चभ्रू कॅथॉलिक समाजाचे आणि संस्कृतीचे दर्शन दियान आणि तिच्या कुटुंबीयांच्या माध्यमाद्वारे घडते. कॅथॉलिक संस्कृतीचे असे सविस्तर चित्रण

मराठी कादंबरीत प्रथमतःच झालेले आहे. मूलतः गोमंतकातील सुसंस्कृत खिस्ती समाजाविषयी लेखकालाच आकर्षण होते, असे दिसते. या कादंबरीतील विलास या व्यक्तिरेखेच्या माध्यमाद्वारे या सुसंस्कृत खिस्ती समाजाविषयी पुढीलप्रमाणे वर्णन येते :

'गोमंतकातील सुसंस्कृत खिस्ती लोकांचे जीवन हाच माझा आदर्श आहे. शास्त्र, कला, व्यवहार या गोष्टींतलं त्यांना थोडंथोडकं तरी समजतं व या संस्कारांच्या जोरावर ते जीवनाच्या अंगोपांगांचा आस्वाद घेऊ शकतात.'

## जीवनाचा आस्वाद घेणे हे प्रादेशिक लक्षण नव्हे :

जीवनाचा आस्वाद घेण्याची मनोवृत्ती खरे तर बोरकरांचीही आहे आणि तिचा प्रत्यय 'मावळता चंद्र' यां कादंबरीद्वारे येतोही. सर्वसाधारणपणे धर्म वेगळे असले, तरी हिंदू-ख्रिश्चन एकात्मता हे गोमंतकीय समाजजीवनाचे आणि संस्कृतीचे एक वैशिष्ट्य मानले जाते. रजनीचे मूल दियानच्या मांडीवर पहुडून स्तनपान करते, हे मॉडेल वापरून शशांकने कुमारी मातेचे चित्र रंगविणे, ही या कादंबरीतील कल्पना लेखकाच्या विशेष गोमंतकीय खिस्ती दृष्टीचा प्रत्यय देणारी आहे.

## बोरकर व वाङ्मयीन संस्कृती :

लेखक ज्या साहित्यपरंपरेत लिहीत असतो, त्या परंपरेच्या प्रभावाने त्याची साहित्यकृती नियंत्रित होत असते. बोरकर ज्या काळात ही कादंबरी लिहीत होते, त्या फडके-खांडेकर युगातील मराठी कादंबरीत असलेले योगायोग, रहस्यस्फोट इत्यादी रंजनादी तंत्रे 'मावळता चंद्र'मध्येही आहेत. मानवी जीवनातील घटिते साहित्यात अवतरणे, हे स्वाभाविकच होय. शशांकने दियानला मॉडेल म्हणून समोर बसवून काढलेले कुमारी मातेचे चित्र लिलावात दियानच्या वडिलांनीच विकत घेणे, ते चित्र पाहिल्यावर त्यांना त्यांच्या पत्नीच्या गतसहवासाची आठवण येणे, ते चित्र पाहता-पाहता आनंदविभोर झाल्याने त्यांना मृत्यू येणे, त्यांच्या मृत्यूनंतर दियानला ते चित्र वडिलांनी मरणोत्तर दिलेली भेट म्हणून लाभणे आणि अंततः आपण काढलेले चित्र दियानला देण्याची शशांकची इच्छा अप्रत्यक्षपणे पूर्ण होणे - हा एक विलक्षण स्वरूपाचा योगायोग कादंबरीत नोंदविला आहे.

तद्वत, रॉबिन आणि शशांक यांची यदृच्छेने भेट होणे व आरंभीच्या भेटीपासूनच त्याच्याशी आपले रक्ताने नाते असावे, असे शशांकला सतत वाटत राहणे आणि शेवटी वडिलांनी बाळगलेल्या अंगवस्त्राचाच हा पुत्र म्हणजेच शशांकचा सावत्र भाऊ होय, असे रहस्य उलगडणे - असे रूढ लेखनतंत्रही उपयोजिलेले आहे. अशा रचनातंत्राचा विचार हा केवळ वाङ्मयीन समीक्षेचा भाग नसतो, तर साहित्यकृतीच्या सामाजिक समीक्षेचाही भाग ठरतो. कारण ही तंत्रे तत्कालीन वाङ्मयीन संस्कृतीत रूढ संकेतांचा निर्देश करणारी असतात.

**'अंधारातील वाट' :**

बोरकरांची 'अंधारातील वाट' कादंबरीसुद्धा तत्कालीन मराठी वाङ्मयपरंपरेतील संकेतव्यूहात अधिकच गुरफटून गेलेली असल्याने *बा. भ. बोरकर यांची कादंबरी* म्हणून काही वेगळी नाममुद्रा उमटविण्यात ती विशेष यशस्वी ठरलेली नाही. खरे तर बोरकरांनी सामाजिक दृष्ट्या एक महत्त्वाचे आशयसूत्र या कादंबरीद्वारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बोरकर तरुणपणी मोहाच्या क्षणी सामाजिक-नैतिक दृष्ट्या पाय घसरल्यामुळे विवाहपूर्व मातृत्व स्वीकाराव्या लागलेल्या तरुण स्त्रियांची व्यथा या कादंबरीद्वारे मांडू पाहतात. रतिसुख क्षुद्र नव्हे, पण विषमताप्रधान समाजरचनेमुळे ते व्यक्तीच्या दृष्टीने दुःखदायक ठरते, हे समाजातले वास्तव होय अन् तेच येथे बोरकरांना अधोरेखित करायचे आहे. पण योगायोग, अनपेक्षितता, सहस्यात्मक मांडणी अशा तत्कालीन वाङ्मयीन संकेताच्या आहारी गेल्याने बोरकर या उपरोल्लेखित वास्तवाला नीटपणे भिडू शकले नाहीत, असे ही कादंबरी वाचताना जाणवू शकते.

कादंबरीच्या नायकाची - प्रकाशाची - आई आणि विजया या समाजाच्या दृष्टीने नैतिक दृष्ट्या पाय घसरलेल्या स्त्रिया होत. शिकवणी घेण्याच्या निमित्ताने विजयाच्या घरी जाणारा प्रकाश एका अवचित क्षणी मोहाला बळी पडतो आणि त्यामुळे विजया तिच्या विवाहाच्या पूर्वीच गर्भवती होते. अभया या वेगळ्या नावाने प्रकाशची आई चालवीत असलेल्या सूतिकागृहातच ती नेमकी दाखल होते. अन्य स्थळी प्रकाशची आई पतीकडून शरीरसुख मिळवू न शकल्याने मोहाला बळी पडून एका ड्रायव्हरकरवी गरोदर राहिलेली व घरच्यांनी घरातून घालवून दिलेली स्त्री होय. प्रकाश ज्या मृदुलेवर

प्रेम करतो, ती युवती म्हणजे डॉ. रंगनाथ यांनी सांभाळ केलेल्या एका वेश्येची कन्या होय. योगायोग असा की, नैतिक अध:पतन झाले म्हणून घरातून घालवून दिलेल्या प्रकाशच्या आईला याच वेश्येने काही दिवस आधार दिलेला असतो. कादंबरीतील या सर्व व्यक्तिरेखांचे जीवनानुभव एकमेकांना एखाद्या रहस्योद्घाटनाच्या पद्धतीने ज्ञात होतात. कादंबरीचा प्रारंभ विजयाच्या जीवनानुभवाने होत असला, तरी तिचा मुख्य भाग 'माझी स्मृतिचित्रे' नामक साहित्यकृतीतील दीर्घ प्रकरणातील प्रकाशच्या आईच्या जीवनानुभवानेच व्यापलेला आहे. खरे तर कादंबरीत स्त्रीची जी नेमकी समस्या आहे, ती मांडण्यासाठी प्रकाशच्या आईची तिच्या बालपणापासूनची जीवनकथा सविस्तरपणे सांगायची गरज होती, असे वाटत नाही. त्यामुळे काहीएक सामाजिक समस्या मांडू पाहणारी ही कादंबरी समस्येचे नीट आकलन-विश्लेषण करण्याऐवजी 'माझी स्मृतिचित्रे' या प्रकरणाने आणि गुंतागुंत, रहस्योद्घाटन यांनीच व्यापलेली वाटते. अंतिमत: विजया-प्रकाश-मृदुला या त्रिकोणात प्रकाश व नायिका मृदुला आणि विलास व विजया यांच्या मीलनानंतर कादंबरीचा शेवटही गोड होतो. या सर्वांमुळे अंतिमत: 'अंधारातील वाट' ही साहित्यकृती तत्कालीन रंजनात्मक कादंबरीच्याच वळणाने जाते व बोरकरांसारख्या प्रतिभावंताची कादंबरी म्हणून ती उणी ठरते. ती कादंबरी म्हणून आशयाच्या सामाजिकतेशी विशेषत्वाने आत्मनिष्ठ राहिलेली नाही, हे स्पष्टच दिसते.

**प्रियकामा :**

बोरकरांची 'प्रियकामा' ही १९८३मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी पौराणिक बाजाची आहे. या ऐंशीच्या दशकात फडके-खांडेकर युगातील कादंबरीची संकल्पना ओलांडून बरीचशी दूर गेली होती. एकीकडे नवकादंबरी म्हणून ती एक वेगळा आकार धारण करीत होती, तर दुसरीकडे पौराणिक-ऐतिहासिक कादंबरीचा प्रवाह पुनश्च एकदा जोमदार व लोकप्रिय होऊ पाहत होता. १९६० नंतरच्या काळात लिहू लागलेले उच्चवर्णीयेतर व अनागरी समाजस्तरांतले बहुतांश कादंबरीकार सामाजिक वास्तवाचा वेध घेऊ पाहत होते, तर पौराणिक-ऐतिहासिक कादंबरीकार व त्यांचे वाचक बहुतांश उच्चवर्णीय नागरी समाजस्तरातले होते. यापूर्वी स्वत:च्या कादंबऱ्यांद्वारे काही ना काही

सामाजिक आशय मांडणारे बोरकर ऐंशीच्या दशकात मात्र पौराणिक कादंबरीलेखनाकडे वळले, ही घटनाही तत्कालीन मराठी वाङ्मयीन संस्कृतीवर प्रकाश टाकणारीच होय. अर्थात, कादंबरी पौराणिक-ऐतिहासिक किंवा फँटसी असली, तरी तिचाही विचार सामाजिक अंगाने करता येऊ शकतो. खांडेकरांची 'ययाती' त्या दृष्टीने विचार करण्यास वाव देते. पण 'प्रियकामा' कादंबरी असा विचार करण्याजोगी आहे, असे फारसे वाटत नाही. ही कादंबरी पौराणिक कथेतून आजच्या जीवनावर काही भाष्य करण्याचा किंवा पौराणिक घटनांचे काही नवे वेगळे आकलन मांडण्याचा प्रयत्न करताना दिसत नाही.

वाल्मीकीविरचित 'रामायणा'तील कैकेयी उपाख्य 'प्रियकामा' या स्त्रीव्यक्तिरेखेभोवती केंद्रित झालेली ही कादंबरी एक स्त्री म्हणून कैकेयीचे मोठेपण मांडणारी साहित्यकृती आहे. रामाला वनवासात पाठवून देणारी आणि दशरथाच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेली एक खलनायिका म्हणून जनमानसात रूढ असणाऱ्या या कैकेयीचे वस्तुस्थितीतील रूप काय होते, हे यात दाखवून दिले आहे. कैकेयीच्या पुत्रांना राजपद देण्याचे तिच्या वडिलांना दशरथाने जे वचन दिले होते, त्या वचनाचा भंग झाला तरी चालेल; पण रामाकडून रावणाचा व त्याच्या राक्षसकुळाचा संहार घडवून आणण्याचे दशरथाने विश्वामित्रांना दिलेल्या वचनाचा भंग होऊ नये, त्यासाठी वैधव्यासही कवटाळणारी त्यागमूर्ती म्हणून 'प्रियकामे'चे चित्र उभे करणे, हाच ह्या कादंबरीचा हेतू होय. त्यासाठी दशरथ व 'प्रियकामा' यांची प्रथम भेट, प्रेमसंबंध, विवाह इथपासून आरंभ होऊन रामाच्या वनवासागमनापर्यंतचे कथानक सरळ रेषेत मांडले जाते. हे कथानक मांडताना 'प्रियकामे'चे सौंदर्य, युद्धकौशल्य, वीरत्व, राजनीतीपण अशा विषयांशी संबंधित वर्णनांद्वारे, व्यक्तिदर्शन घडविण्यावर हे कादंबरीलेखन केंद्रित करण्यात आले आहे.

**बोरकरांच्या कादंबऱ्यांची स्त्रीव्यक्तिरेखा :**

केवळ 'प्रियकामा'च नव्हे, तर बोरकरांच्या सर्वच कादंबऱ्यांत स्त्री-व्यक्तिरेखांनाच केंद्रस्थान प्राप्त झाले आहे. यातही सामान्यत्वापेक्षा असामान्यत्वाकडे झुकणारे सौंदर्य आणि मानवी गुणांच्या बाबतीत श्रेष्ठ, आदर्श ठरलेल्या स्त्रिया लेखकाच्या आत्मीयतेचा विषय झालेल्या दिसतात. पारंपरिक गृहिणीपेक्षा मुक्त,

बंडखोर आणि स्वतंत्री वृत्तीची स्त्री या गोमंतकीय लेखकाला महत्त्वाची वाटते. मग ती 'भावीण'मधली शेवती असो किंवा 'मावळता चंद्र'मधील दियान किंवा 'अंधारातील वाट'मधील प्रकाशची आई असो; या सर्व स्त्री-व्यक्तिरेखा सर्वसामान्य स्त्रियांपेक्षा *जरा से हटके* घाटातल्या आहेत.

बंडखोरपणा हे सौंदर्यवादाचे एक वैशिष्ट्य म्हणूनच नोंदविले जाते. बोरकरांच्या कादंबरीतील स्त्री-चित्रणात लेखकाच्या सौंदर्यवादी निर्भरशील वृत्तीचा आविष्कार होणे, हे स्वाभाविकच होय. कादंबरीत एकीकडे अशा वेगळ्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा रेखाटल्या जातात; तर कादंबरीतील बऱ्याच पुरुषांना सामान्य, पारंपरिक गृहिणीबरोबर संसार करण्यात, सहजीवन व्यतीत करण्यात विशेषत्वाने रस वाटत नाही, असे शब्दांकित केले जाते. अशा पुरुष व्यक्तिरेखा हाही लेखकाच्या समाजनिरीक्षणाचा भाग असू शकतो. बोरकरांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अंगाने विचार करताना अंततः निष्कर्षरूपाने असे म्हणता येते की, कोणत्याही लेखकाप्रमाणेच बोरकरांचेही सामाजिक-सांस्कृतिक संचित त्यांच्या कादंबऱ्यांच्याद्वारे आविष्कृत झाले आहे. त्यामुळे गोमंतकीय परिसर, समाज व संस्कृती या वास्तव जीवनानुभवांचा स्पर्श त्यांच्या कादंबऱ्या लेवून येतात.

त्या कादंबऱ्यांच्या आशयाद्वारे काहीएक सामाजिक आशय, समस्या मांडू पाहतात; पण आशयाची ही सामाजिकता समकालीन वाङ्मयीन संकेतांना छेद देऊन कादंबरीद्वारे निखळपणे व्यक्त होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या खांडेकरी वळणावर जाऊ पाहणाऱ्या दिसतात. लेखक म्हणून त्यांची जीवनदृष्टीही आवश्यक तिथे वर्गजाणिवेच्या मर्यादा ओलांडू शकत नाही. या सर्व मर्यादांसहित 'भावीण' किंवा 'मावळता चंद्र' या त्यांच्या कादंबऱ्या जेवढ्या लक्षवेधी ठरतात, तेवढ्या 'अंधारातील वाट' वा 'प्रियकामा' या ठरू शकत नाहीत. एकूणच, एक कवी म्हणून मराठी साहित्यविश्वावर स्वतःची नाममुद्रा उमटविण्यात बाळकृष्ण भगवन्त बोरकर जेवढे यशस्वी झाले, तेवढे यश त्यांना त्यांच्या कादंबरीलेखनाद्वारे संपादता आले असते; पण कालप्रभाव हा लेखनवृत्तीवर अधिक दडपण आणून ठेवतो, ही वस्तुस्थिती नाकारण्यात काय हंशील?

---